**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

प्रा.एम.एल.मतकर
एस-२, नवदुर्गा अपार्टमेंट, ६०-ई, ए-वॉर्ड,
खंडोबा मंदिराजवळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव/संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५+२९६+२९७+२९८/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** प्रा.एम.एल.मतकर
एस-२, नवदुर्गा अपार्टमेंट, ६०-ई, ए-वॉर्ड, खंडोबा मंदिराजवळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव/संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर डॉ.अ.आ.डांगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.८.२००७ (तीन अर्ज),<br>दि.१९.७.२००७, दि.२९.८.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.८.२००७(तीन अपिले), दि.१६.८.२००७, दि.१.१०.२००७ (दोन अपिले) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.८.२००७(चार अपिले) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय संलग्नीकरणाचा प्रस्ताव शिवाजी विद्यापीठाकडे सादर केला होता. या संदर्भात आपण पाच अर्ज केले, परंतु विहित मुदतीत माहिती मिळाली नाही. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ८२(२) अन्वये केलेला बृहत् आराखडा चुकीचा असून आपल्या स्वत:वर अन्याय होत आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता प्रा.एम.एल.मतकर यांनी केले.

ज्ञानभारती सामाजिक सेवा संस्था, सातारा या संस्थेने जून २००७ पासून कृष्णानगर येथे वाणिज्य शाखे अंतर्गत बीबीए/बीसीए नवीन महाविद्यालये सुरू करण्यासाठी प्रस्ताव दाखल केला होता. बृहत् आराखड्यात तरतूद असल्याशिवाय कोणत्याही नवीन महाविद्यालयास/अभ्यासक्रमास मान्यता देता येत नाही. त्यामुळे या संस्थेचा प्रस्ताव स्वीकारता येत नसल्याचे प्रा.मतकर यांना कळविण्यात आले. याबाबतच्या फेरविचारासाठी त्यांनी केलेल्या पत्रव्यवहारावरही वेळोवेळी उत्तर देण्यात आले. अन्य काही संस्थांविषयीची माहिती त्यांनी मागितली होती, ती नाकारण्यात आली. परंतु ऊर्वरित माहितीबाबत शुल्क भरून प्रती घेणे अथवा अभिलेख अवलोकन करणे असे दोन्ही पर्याय देण्यात आले होते. यातील कोणतीही पूर्तता त्यांनी केली नाही. दि.९.७.२००८.च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळीही हे स्पष्ट करून प्रा.मतकर यांना पुन्हा पत्र पाठविले होते. प्रस्तावाच्या संदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सन २००६ पासून उपलब्ध

ठेवली होती, त्यातील त्यांच्या स्वतःचा प्रस्ताव नाकारल्याबाबतच्या माहितीचाही समावेश आहे, असे पतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव/संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर डॉ.अ.आ.डांगे यांनी पूरक कागदपत्रासह केल.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता प्रा.मतकर यांना विद्यापीठाने वेळोवेळी उत्तर दिले आहे. तसेच संकेतस्थळावरही माहिती उपलब्ध असून सर्व अभिलेखाचे अवलोकन करण्याबाबतही पत्रव्यवहार केला आहे. प्रस्ताव नाकारणे योग्य की अयोग्य, संलग्नीकरण करण्याबाबत गैरकारभार व भ्रष्टाचार झाला आहे का, याबाबतची संपूर्ण चौकशी करण्याची मागणी या बाबींचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत याचा विचार करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणेः

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे**
**दि.१९.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रंगराव रामचंद्र शेळके
मडिलगे बु., ता.भुदरगड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

---

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरदायी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
कोल्हापूर जनता सहकारी बँक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ (वर्ग) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दिवशी अपीलकर्ता गैरहजर होते.

कोल्हापूर जनता सहकारी बँक, कोल्हापूर ही नागरी सहकारी बँक असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही श्री.शेळके यांना माहिती दिली आहे व बँकेकडे तशी पोहोच आहे, असे प्रतिपादन बँकेचे व्यवस्थापक यांनी केले. श्री.रंगराव रामचंद्र शेळके यांनी केलेल्या अर्जानुसार माहिती देण्याबाबत बँकेला कळविले. बँकेने माहिती दिली. श्री.शेळके यांनी केलेले अपील मुद्रांक शुल्क नसल्यामुळे व कळवूनही पूर्तता न केल्यामुळे निकाली काढण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.१६.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रंगराव रामचंद्र शेळके
मडिलगे बु., ता.भुदरगड, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरदायी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
कोल्हापूर जनता सहकारी बँक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.धनंजय डोईफोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ (वर्ग) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१८.१२.२००८ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दिवशी अपीलकर्ता गैरहजर होते.

कोल्हापूर जनता सहकारी बँक, कोल्हापूर ही नागरी सहकारी बँक असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, तरीही श्री.शेळके यांना माहिती दिली आहे व बँकेकडे तशी पोहोच आहे, असे प्रतिपादन बँकेचे व्यवस्थापक यांनी केले. श्री.रंगराव रामचंद्र शेळके यांनी केलेल्या अर्जानुसार माहिती देण्याबाबत बँकेला कळविले. बँकेने माहिती दिली. श्री.शेळके यांनी केलेले अपील मुद्रांक शुल्क नसल्यामुळे व कळवूनही पूर्तता न केल्यामुळे निकाली काढण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

<u>**आदेश**</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. महारूद्र कडाजी तिकुंडे
१+२ ब, कामाठीपुरा, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सातारा, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कार्यालय सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,<br>सातारा, जि. सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड, लेखापाल<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,<br>सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कार्यालय सातारा, जि. सातारा<br>तर्फे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड, लेखापाल | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.१२.२००८ सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. महारूद्र कडाजी तिकुंडे यांनी विस्तृत माहिती मागितली असून कळविलेले शुल्क भरले नाही. माहिती नि:शुल्क द्यावी असा त्यांचा आग्रह आहे. ही माहिती तयार करून देण्याचे ठरविले तर पूर्ण एक शासकीय कार्यालय कित्येक दिवस माहिती तयार करण्यासाठी वापरावे लागेल. अपीलकर्ता शुल्क भरण्यास तयार नसून फक्त अर्ज व अपिले करीत असून त्यांचा अपील करण्याचा उद्देशच कळत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.तानाजी गायकवाड यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. त्यांचे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड यांनी त्याचा पुनरूच्चार केला. अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. महारूद्र कडाजी तिकुंडे
१+२ ब, कामाठीपुरा, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सातारा, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कार्यालय सातारा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सातारा, जि. सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड, लेखापाल

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, कार्यालय सातारा, जि. सातारा
तर्फे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड, लेखापाल

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.१२.२००८ सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. महारूद्र कडाजी तिकुंडे यांनी विस्तृत माहिती मागितली असून कळविलेले शुल्क भरले नाही. माहिती नि:शुल्क द्यावी असा त्यांचा आग्रह आहे. ही माहिती तयार करून देण्याचे ठरविले तर पूर्ण एक शासकीय कार्यालय कित्येक दिवस माहिती तयार करण्यासाठी वापरावे लागेल. अपीलकर्ता शुल्क भरण्यास तयार नसून फक्त अर्ज व अपिले करीत असून त्यांचा अपील करण्याचा उद्देशच कळत नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.तानाजी गायकवाड यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. त्यांचे प्रतिनिधी श्री. तानाजी गायकवाड यांनी त्याचा पुनरूच्चार केला. अपीलकर्त्याने आवश्यक असल्यास शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १७.११.२००९

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. कैलास गोपाळ रंधवे
प्रज्ञा बिल्डिंग, जुना एस.टी,स्टॅण्ड शेजारी,
आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
खेड तहसील कार्यालय, ता. खेड, जि.पुणे — **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी तहसीलदार,
खेड तहसील कार्यालय, ता. खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१०८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. कैलास गोपाळ रंधवे
प्रज्ञा बिल्डिंग, जुना एस.टी,स्टॅण्ड शेजारी,
आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
खेड तहसील कार्यालय, ता. खेड, जि.पुणे श्री.सुभाष भागडे

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी तहसीलदार,
खेड तहसील कार्यालय, ता. खेड, जि.पुणे श्री.दिगंबर रौंधळ

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०१.०१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.०१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.०१.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** आणेवारीप्रमाणे नावे दाखल करण्यासाठी आदेशाची प्रत मिळण्याबाबत. | |

## विवेचन

जमिनीच्या फेरफारात नजरचुकीने श्री.गोपाळ रावळा रंधवे यांचे नांव दाखल करावयाचे राहिलेले आहे. ती नोंद करण्याबाबतचा आदेश तहसीलदार, खेड, जि.पुणे यांनी द्यावा, अशी मागणी आपण केली होती. मूळ आदेश २४.१.१९८४ ला झालेला असून ७/१२ दुरूस्त करण्याबाबतच्या मागणीसाठी आपल्याला स्वतंत्र अर्ज करण्यास सांगण्यात आले, परंतु आदेशाची प्रत मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.कैलास गोपाळ रंधवे यांनी केले.

तहसीलदार, खेड यांच्याकडील दि.२४.१.१९८४ च्या आदेशान्वये लावलेल्या आणेवारीत एका गटावर आणेवारी लावण्याचे नजरचुकीने राहून गेले आहे. तत्कालीन तलाठ्याच्या हस्तदोषामुळे नोंदीबाबत चूक झाली, असे श्री.रंधवे यांचे म्हणणे आहे. ही दुरूस्ती करणे तहसीलदारांच्या कार्यकक्षेत येत असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाखाली स्वतंत्र अर्ज केल्यास त्यावर गुणवत्तेनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे श्री.रंधवे यांना स्पष्ट करण्यात आले आहे. श्री.रंधवे यांच्या भावकीतील सर्व संबंधितांना नोटीस काढून त्यांचे जबाब घेऊन याबाबतची कार्यवाही करता येईल, परंतु त्यासाठी अपीलकर्ता यांनी सर्वांचे पत्ते देऊन स्वतंत्र अर्ज करणे

आवश्यक आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय खेड, ता.खेड, जि.पुणे यांनी नमूद केले. अपीलकर्त्याची मुख्य मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नसून प्रशासकीय कार्यवाहीची आहे व त्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य मार्गदर्शन केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१२.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. अरुण भाटिया
पोस्ट बॉक्स क्र.- ४,
येरवडा, पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि. १८.३.२००८ |
| **३** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद पुणे श्री. आर. पी. शिवदास | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००५ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - पुणे जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींसंदर्भातील माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरुण भाटिया यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत आयोगाच्या दि. २५.७.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदर पत्रास श्री भाटिया यांच्याकडून प्रतिसाद मिळालेला नाही. तद्नंतर सदर अपिलाचा समावेश दि. १८.३.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. भाटिया हे अनुपस्थित राहिल्याने त्यांना अपेक्षित

असणारी माहिती जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांच्याकडून प्राप्त झाली अथवा कसे, याबाबत त्यांच्याकडे आयोगाच्या दि. १६.४.२००८ च्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली, परंतु सदर पत्रास श्री. भाटिया यांनी कोणतेही उत्तर दिलेले नाही. सबब श्री. भाटिया यांना सदरचे अपील चालविण्यात कोणतेही स्वारस्य दिसून येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ
रा. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पन्हाळा, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत मौजे मसूद-माले, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ
रा. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पन्हाळा, जि. कोल्हापूर श्री. अे.आर.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत मौजे मसूद-माले, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर श्री. विनोद भारत पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

नगर भूमापन अधिकारी व ग्रामपंचायत यांनी आपल्याला कळविलेल्या एका क्षेत्राच्या मोजमापात तफावत आहे, तसेच घरफाळा करआकारणी चुकीची करण्यात आली आहे. नगर भूमापन कार्यालयाकडील मोजमापाप्रमाणे नोंद व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जगन्नाथ मारूती संकपाळ यांनी केली.

श्री. संकपाळ यांना माहिती देण्यात आली आहे. जागेच्या क्षेत्रफळाची दुरूस्ती व त्या अनुषंगाने करआकारणी करण्याबाबतची त्यांची मागणी असून दि. १४.६.२००८ रोजी दुरूस्ती करण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मसूद-माले ता.पन्हाळा श्री. विनोद भारत पाटील यांनी केले. त्यानुसार दुरूस्ती क्षेत्रफळाबाबत पत्र अपीलकर्त्यास देण्याचे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दिलेली माहिती चुकीची असून कर आकारणी चुकीची आहे. क्षेत्रफळामधील दुरूस्ती बेकायदेशीर आहे, असे लेखी निवेदन श्री. संकपाळ यांनी दि.१.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. मात्र माहिती देण्यात आली असून त्यांची तक्रार प्रशासकीय कार्यवाहीच्या योग्य-अयोग्यतेबद्दलची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १६.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ
रा. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पन्हाळा, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत मौजे मसूद-माले, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. जगन्नाथ मारुती संकपाळ
रा. माले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पन्हाळा, जि. कोल्हापूर श्री. अे.आर.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत मौजे मसूद-माले, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर श्री. विनोद भारत पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

<u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

नगर भूमापन अधिकारी व ग्रामपंचायत यांनी आपल्याला कळविलेल्या एका क्षेत्राच्या मोजमापात तफावत आहे, तसेच घरफाळा करआकारणी चुकीची करण्यात आली आहे. नगर भूमापन कार्यालयाकडील मोजमापाप्रमाणे नोंद व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जगन्नाथ मारूती संकपाळ यांनी केली.

श्री. संकपाळ यांना माहिती देण्यात आली आहे. जागेच्या क्षेत्रफळाची दुरूस्ती व त्या अनुषंगाने करआकारणी करण्याबाबतची त्यांची मागणी असून दि. १४.६.२००८ रोजी दुरूस्ती करण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत मसूद-माले ता.पन्हाळा श्री. विनोद भारत पाटील यांनी केले. त्यानुसार दुरूस्ती क्षेत्रफळाबाबत पत्र अपीलकर्त्यास देण्याचे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दिलेली माहिती चुकीची असून कर आकारणी चुकीची आहे. क्षेत्रफळामधील दुरूस्ती बेकायदेशीर आहे, असे लेखी निवेदन श्री. संकपाळ यांनी दि.१.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले. मात्र माहिती देण्यात आली असून त्यांची तक्रार प्रशासकीय कार्यवाहीच्या योग्य-अयोग्यतेबद्दलची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा समावेश होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री.सदानंद तुकाराम आमते
व श्री. सदाशिव द. पाटील
रा. कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर — अपीलकर्ते

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, करवीर, ता.करवीर, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, कोथळी ,
ता.करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३ / कोल्हापूर |
| २ | सनावणीची तारीख | दि. ६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सदानंद तुकाराम आमते
व श्री. सदाशिव द. पाटील
रा. कोथळी, ता.करवीर, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, करवीर, ता.करवीर, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. लाखे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, कोथळी ,
ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री. वसंत शंकर पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.४.२००५ |
| ५ | जा माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.-- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.४.२००८ |

८. माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. ९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.६.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, कोथळी या संस्थेच्या सचिवांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई केली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सदानंद तुकाराम आमते यांनी केले. श्री. आमते यांनी आपल्या संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड अद्याप केली नाही, व्याजासह रू. २६०००/- हून अधिक रक्कम येणे बाकी आहे. ही सर्व रक्कम भरल्यास माहिती देण्यास तयार असल्याचे त्यांना कळविले आहे. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी आदेश दिल्यानंतर त्यांच्या तीनही अर्जावरील माहिती दिली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, कोथळी श्री. वसंत शंकर पाटील यांनी केले. संस्थेने माहिती दिली असूनही माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्त्याने केली आहे. दिलेल्या माहितीची प्रत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे सादर केली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. लाखे यांनी संबंधित प्रतींसह नमूद केले. हे लक्षात घेता अपीलकर्त्यांच्या तक्रारीत तथ्य नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नागरी सहकारी पतसंस्थाना लागू होत नाही असा निर्णय मुंबइ उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २६.११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

प्रा. अरूण तुकाराम पाटील
मु.पो.मलतवाडी, ता.चंदगड, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
सरसेनापती प्रतापराव गुर्जर शिक्षण संस्था, कानडेवाडी,
ता. गडहिंग्लज, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
राजा शिवछात्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
कानडेवाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४ + ३३८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
सरसेनापती प्रतापराव गुर्जर शिक्षण संस्था, कानडेवाडी,
ता. गडहिंग्लज, कोल्हापूर श्री. नारायण रामभाऊ पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
राजा शिवछात्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
कानडेवाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर प्रा. डॉ. निवास जाधव

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३२४ / कोल्हापूर | ३०.१.२००८ | -- | २४.३.२००८ | -- |
| ३३८/ कोल्हापूर | २४.३.२००८ | -- | २५.४.२००८ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्थेच्या राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयात अनेक गैरप्रकार घडत असून महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री. बी. ए. पाटील हे १२ वी नापास असताना दाखल्यामध्ये खाडाखोड करून पास म्हणून दाखविले. महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य एन. आर. पाटील कधीही महाविद्यालयात उपस्थित नसतात, तसेच तासांनाच मुले नसल्याने प्राध्यापक बाजारपेठेत इकडे तिकडे फिरत असतात, अशा स्वरूपाच्या तक्रारी करून अपीलकर्ता प्रा. ए.टी. पाटील यांनी विविध स्वरूपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, कानडेवाडी, ता. गडहिंग्लज यांच्याकडे मागितली होती. ही माहिती आपल्याला दिली जात नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता प्रा. ए.टी. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केले आहे.

प्रा. पाटील संस्थेकडे अर्ज न करता शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ आदींकडे अनेक अर्ज व पत्रव्यवहार, तसेच माहितीची मागणी करणारे अर्जही करतात. असे त्यांचे अनेक अर्ज संस्थेकडे असून त्याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. अनेक कागदपत्रे त्यांनी स्वतः अपुरी ठेवली असून काही कागदपत्रे त्यांच्याकडेच आहेत. वेगवेगळ्या ठिकाणांवरून काही कागदपत्रे मिळवून मिळालेल्या छायांकित प्रतीवर स्वतः बदल करुन ती बनावट कागदपत्रे तेच इतरांना पुरवीत असतात. श्री. बी. ए. पाटील यांचा शाळा सोडल्याचा दाखला अपीलकर्त्याने स्वतः तयार केला आहे. निरनिराळ्या प्रकारे संस्थेविरूध्द व महाविद्यालयाविरूध्द खोट्या तक्रारी करणे, खोट्या बातम्या पसरवून कागदपत्रांमध्ये अनधिकाराने बदल करून ती खरी असल्याचे भासविणे अशा प्रकारे अपीलकर्ता संस्थेची व महाविद्यालयाची बदनामी करीत आहेत, असे प्रतिपादन जन

माहिती अधिकारी तथा प्राचार्य डॉ. निवास जाधव यांनी केले. खोट्या तक्रारीबाबत अपीलकर्त्याविरूध्द गुन्हा दाखल केला असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, सरसेनापती प्रतापराव गुर्जर शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता. गडहिंग्लज, कोल्हापूर श्री. नारायण रामभाऊ पाटील यांनी सांगितले. या संदर्भातील सविस्तर लेखी निवेदन पूरक कागदपत्रांसह त्यांनी सादर केले. ते पाहता अपीलकर्त्याचा माहितीच्या अधिकाराचा वापर या कायद्याच्या गाभ्याशी सुसंगत असा दिसत नाही. संस्थेने चुकीची माहिती देता कामा नये, तसेच दिलेल्या माहितीचे विकृतीकरण अपीलकर्त्याने करता कामा नये, याची समज उभय घटकांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

प्रा. अरूण तुकाराम पाटील
मु.पो.मलतवाडी, ता.चंदगड, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
सरसेनापती प्रतापराव गुर्जर शिक्षण संस्था, कानडेवाडी,
ता. गडहिंग्लज, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
राजा शिवछात्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
कानडेवाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४ + ३३८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
सरसेनापती प्रतापराव गुर्जर शिक्षण संस्था, कानडेवाडी,
ता. गडहिंग्लज, कोल्हापूर श्री. नारायण रामभाऊ पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
राजा शिवछात्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय,
कानडेवाडी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर प्रा. डॉ. निवास जाधव

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३२४ / कोल्हापूर | ३०.१.२००८ | -- | २४.३.२००८ | -- |
| ३३८/ कोल्हापूर | २४.३.२००८ | -- | २५.४.२००८ | -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्थेच्या राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालयात अनेक गैरप्रकार घडत असून महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री. बी. ए. पाटील हे १२ वी नापास असताना दाखल्यामध्ये खाडाखोड करून पास म्हणून दाखविले. महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य एन. आर. पाटील कधीही महाविद्यालयात उपस्थित नसतात, तसेच तासांनाच मुले नसल्याने प्राध्यापक बाजारपेठेत इकडे तिकडे फिरत असतात, अशा स्वरूपाच्या तक्रारी करून अपीलकर्ता प्रा. ए.टी. पाटील यांनी विविध स्वरूपाची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, कानडेवाडी, ता. गडहिंग्लज यांच्याकडे मागितली होती. ही माहिती आपल्याला दिली जात नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, असे लेखी प्रतिपादन अपीलकर्ता प्रा. ए.टी. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केले आहे.

प्रा. पाटील संस्थेकडे अर्ज न करता शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ आदींकडे अनेक अर्ज व पत्रव्यवहार, तसेच माहितीची मागणी करणारे अर्जही करतात. असे त्यांचे अनेक अर्ज संस्थेकडे असून त्याबाबत वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. अनेक कागदपत्रे त्यांनी स्वतः अपुरी ठेवली असून काही कागदपत्रे त्यांच्याकडेच आहेत. वेगवेगळ्या ठिकाणांवरून काही कागदपत्रे मिळवून मिळालेल्या छायांकित प्रतीवर स्वतः बदल करुन ती बनावट कागदपत्रे तेच इतरांना पुरवीत असतात. श्री. बी. ए. पाटील यांचा शाळा सोडल्याचा दाखला अपीलकर्त्याने स्वतः तयार केला आहे. निरनिराळ्या प्रकारे संस्थेविरूध्द व महाविद्यालयाविरूध्द खोट्या तक्रारी करणे, खोट्या बातम्या पसरवून कागदपत्रांमध्ये अनधिकाराने बदल करून ती खरी असल्याचे भासविणे अशा प्रकारे अपीलकर्ता संस्थेची व महाविद्यालयाची बदनामी करीत आहेत, असे प्रतिपादन जन

माहिती अधिकारी तथा प्राचार्य डॉ. निवास जाधव यांनी केले. खोट्या तक्रारीबाबत अपीलकर्त्याविरूध्द गुन्हा दाखल केला असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, सरसेनापती प्रतापराव गुर्जर शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता. गडहिंग्लज, कोल्हापूर श्री. नारायण रामभाऊ पाटील यांनी सांगितले. या संदर्भातील सविस्तर लेखी निवेदन पूरक कागदपत्रांसह त्यांनी सादर केले. ते पाहता अपीलकर्त्याचा माहितीच्या अधिकाराचा वापर या कायद्याच्या गाभ्याशी सुसंगत असा दिसत नाही. संस्थेने चुकीची माहिती देता कामा नये, तसेच दिलेल्या माहितीचे विकृतीकरण अपीलकर्त्याने करता कामा नये, याची समज उभय घटकांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नंदकुमार आनंदराव नागटिळे
वारणा सहकारी दूध संघ, तात्यासाहेब कोरे नगर, — अपीलकर्ता
अमृत नगर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
भुदरगड, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा
संस्था मर्या., म्हसवे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. नंदकुमार आनंदराव नागटिळे
वारणा सहकारी दूध संघ, तात्यासाहेब कोरे नगर,
अमृत नगर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
भुदरगड, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. एस. जी. साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा
संस्था मर्या., म्हसवे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. यु.एस.माने

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. .२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

---

आपण कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा संस्था मर्या., म्हसवे या सेवा संस्थेत आपण सभासद असून आपल्या नावाचा दुरूपयोग करून कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा संस्थेच्या सचिवांनी परंस्पर खोटे कागद करून ऊस बिलाची व अन्य रक्कम हडप केली आहे, त्याबाबत आपण मागितलेली माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नंदकुमार आनंदराव नागटिळे यांनी केली.

श्री. नागटिळे हे आपल्या संस्थेचे सभासद नाहीत. त्यांना कोणतेही कर्ज दिलेले नाही. माहितीच्या अधिकारात कोणताही अर्ज त्यांनी संस्थेकडे केलेला नाही. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गारगोटी, ता. भुदरगड यांच्याकडून श्री. नागटिळे यांच्या अर्जाबाबतची माहिती संस्थेला मिळाली व त्यानंतर संस्थेने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे संपूर्ण खुलासा सादर केला. श्री. नागटिळे यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या कर्जाच्या वसुलीचा तपशील त्यात दिलेला आहे. त्यांचे वडील व भाऊ पूर्वी एकत्र राहत होते. कौटुंबिक वादातून ते अशा स्वरूपाचे अर्ज व आरोप करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा संस्था मर्या., म्हसवे श्री. यु. एस. माने यांनी केले.

श्री. नागटिळे यांना संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांच्या तक्रारीबाबतची चौकशी हा स्वतंत्र प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून पंधरा दिवसात ती पूर्ण केली जाणार आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड श्री. एस. जी. साळुंखे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्र पाहता अपीलकर्त्याची मूळ मागणी तक्रारीच्या चौकशीशी निगडित असून हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच त्याबाबतची कार्यवाही उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या पातळीवर करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

---

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नंदकुमार आनंदराव नागटिळे
वारणा सहकारी दूध संघ, तात्यासाहेब कोरे नगर, अपीलकर्ता
अमृत नगर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
भुदरगड, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा
संस्था मर्या., म्हसवे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री. नंदकुमार आनंदराव नागटिळे<br>वारणा सहकारी दूध संघ, तात्यासाहेब कोरे नगर,<br>अमृत नगर, ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>भुदरगड, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. एस. जी. साळुंखे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,<br>कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा<br>संस्था मर्या., म्हसवे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर श्री. यु.एस.माने | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. .२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.९.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १८.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा संस्था मर्या., म्हसवे या सेवा संस्थेत आपण सभासद असून आपल्या नावाचा दुरूपयोग करून कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा संस्थेच्या सचिवांनी परस्पर खोटे कागद करून ऊस बिलाची व अन्य रक्कम हडप केली आहे, त्याबाबत आपण मागितलेली माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नंदकुमार आनंदराव नागटिळे यांनी केली.

श्री. नागटिळे हे आपल्या संस्थेचे सभासद नाहीत. त्यांना कोणतेही कर्ज दिलेले नाही. माहितीच्या अधिकारात कोणताही अर्ज त्यांनी संस्थेकडे केलेला नाही. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, गारगोटी, ता. भुदरगड यांच्याकडून श्री. नागटिळे यांच्या अर्जाबाबतची माहिती संस्थेला मिळाली व त्यानंतर संस्थेने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे संपूर्ण खुलासा सादर केला. श्री. नागटिळे यांच्या वडिलांच्या नावे असलेल्या कर्जाच्या वसुलीचा तपशील त्यात दिलेला आहे. त्यांचे वडील व भाऊ पूर्वी एकत्र राहत होते. कौटुंबिक वादातून ते अशा स्वरूपाचे अर्ज व आरोप करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, कै. बापुराव गोपाळराव देसाई विकास कार्यकारी सेवा संस्था मर्या., म्हसवे श्री. यु. एस. माने यांनी केले.

श्री. नागटिळे यांना संपूर्ण माहिती दिलेली आहे. त्यांच्या तक्रारीबाबतची चौकशी हा स्वतंत्र प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून पंधरा दिवसात ती पूर्ण केली जाणार आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भुदरगड श्री. एस. जी. साळुंखे यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्र पाहता अपीलकर्त्याची मूळ मागणी तक्रारीच्या चौकशीशी निगडित असून हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच त्याबाबतची कार्यवाही उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या पातळीवर करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.११.२००९